# PROFIT ADVERTISERS (INDIA) Pvt. Ltd.

| | |
|---|---|
| | **PRESS CLIPPING** |
| Client | Agrovision [2nd Day) |
| Publication | Punyanagari |

| Language | Place | Date |
|---|---|---|
| Marathi | Nagpur | 13/11/16 |

# उसामुळे विदर्भात घडेल अर्थक्रांती

## ■ शेतकऱ्यांनो, नगदी पिकांकडे वळा : टिचकुले

पुण्य नगरी / प्रतिनिधी

**नागपूर** : विदर्भात उसाच्या लागवडीसाठी पोषक वातावरण आहे. त्यामुळे येथील शेतकऱ्यांनी उसाच्या लागवडीकडे वळावे, असे आवाहन ऊस उत्पादक प्रगतिशील शेतकरी दादासाहेब टिचकुले यांनी केले आहे. शिवाय उसामुळे विदर्भात घडेल अर्थक्रांती घडेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

ॲग्रोव्हिजन कृषी प्रदर्शनात आयोजित कार्यशाळेत बोलताना उसलागवडीसंदर्भात त्यांनी माहिती दिली. ते म्हणाले, विदर्भातील उसाच्या शेतीला ३०० वर्षांचा इतिहास आहे.

कोहळी समाजाने या भागात ऊस लागवड करीत त्यापासून गुळ उत्पादन केले. याच भागातून आदर्श घेत पश्चिम महाराष्ट्रात ऊस लागवडीला सुरुवात झाली. तेथे नेत्यांनी या पिकाला राजाश्रय दिला. पश्चिम महाराष्ट्रात दोन कोटी गाळप क्षमतेचे साखर कारखाने आहेत; तर विदर्भात केवळ चार लाख टन ऊस गाळप क्षमतेचे कारखाने आहेत. विदर्भातील साखर कारखान्यांची संख्या वाढल्यास ऊस उत्पादनाला वाव मिळेल आणि शेतकरी या पिकाकडे वळतील. पारंपरिक पिकांना हे पीक सक्षम पर्याय ठरेल. विदर्भातही या पिकाच्या माध्यमातून अर्थक्रांती घडेल, असे टिचकुले यांनी नमूद केले.

# हरितगृह तंत्रज्ञान शेतकऱ्यांसाठी वरदान

## ■ शेडनेट हाउसचा लाभ घ्या : जगताप

**नागपूर** : शेडनेट आणि पॉली हाऊससाठी शासनातर्फे मोठ्या प्रमाणात अनुदान दिले जाते. याचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा. कारण शेडनेट हाऊस हे शेतकऱ्यांनी वरदान ठरणार आहे, असे प्रतिपादन हरितगृहतज्ज्ञ हेमंत जगताप यांनी केले.

ॲग्रोव्हिजन कृषी प्रदर्शनात हरितगृह तंत्रज्ञान या विषयावरील कार्यशाळेचे शनिवारी आयोजन करण्यात आले होते. या वेळी मार्गदर्शन करताना जगताप यांनी हरितगृह तंत्रज्ञानाची विस्तृत माहिती दिली. शेडनेटचे दोन प्रकार असून, त्यात सपाट व गोलाकार शेटनेटचा समावेश आहे. सपाट शेडनेट हाऊसमध्ये कमी उंचीचे भाजीपाला पिके घेता येणे शक्य आहे. शेडनेटमुळे पिकांचे जनावरांपासून संरक्षण राहते. गरजेनुसार सूर्यप्रकाश मिळतो. त्यामुळे झाडांची योग्य वाढ आणि नुकसान टाळण्यास मदत होते. एकरपेक्षा जास्त जमीन असलेले शेतकरीदेखील शेडनेट तयहहार करून अनुदान घेऊ शकतात. शेडनेट तयार करण्यासाठी अत्यंत कमी खर्च येतो. पॉलिहाऊस हा त्या तुलनेत खर्चिक असल्याचे जगताप यांनी या वेळी सांगितले.